||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, फुले (७८६), फुले आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेज थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४३ वा | बुधवार, दि. ०६ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# फडणवीसांनी तात्काळ राजीनामा द्यावा; राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा

## पेढे वाटणाऱ्या, फटाके फोडणाऱ्या मुख्यमंत्र्यात माणुसकीच राहिलेली नाही : खा.प्रणिती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नसरापूरमधील चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला. तसेच, सोलापुरात तीन दिवसांत दहा मर्डर झाले आहेत. सोलापूरसह संपूर्ण राज्याची कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून गृहमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

नसरापुरातील अत्याचाराचं प्रकरण घडलेले असताना आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जल्लोष करतात, पेढे वाटतात, त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात काही माणुसकीच राहिली नाही, असं मला वाटतं, असा गंभीर आरोपही खासदार शिंदे यांनी केला.

प्रणिती शिंदे म्हणाल्या, नसरापुरातील नराधमाने चिमुकलीवर अत्याचार करून तिचा अत्यंत निर्घृणपणे खून केला. शक्ती कायदा लागू केला असता त्याला पंधरा दिवसांत फाशी झाली असती. त्याला लवकरात लवकर फाशी द्यावी, अशी आमची मागणी आहे. पण, मुख्यमंत्री फडणवीस यांनी जल्लोष करून पेढे वाटले, त्यावरून स्पष्ट होतं की 'पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांपासून भाजप कार्यकर्त्यांपर्यंत सर्वाजण निवडणुकीसाठीच काम करतात. त्यांच्यासाठी निवडणुका हेच सबकुछ आहे.



चिमुकलीवर अत्याचार होऊन वाईट पद्धतीने तिचा खून केला जातो, त्याची आठवण ठेवून भाजपने जल्लोष केला नसता. तसेच, चिमुकलीसाठी आम्ही जल्लोष करत नाही, असं म्हणाला असता तर तुमच्यात थोडीतरी माणुसकी शिल्लक आहे, असं आम्हाला वाटलं असतं. त्याउलट तुम्ही जल्लोष केला आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी उद्घाटनाचे कार्यक्रम घेतले, असा आरोपही शिंदे यांनी केली.

त्या म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये काही माणुसकीच राहिली नाही, असं मला वाटतं. त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे. नसरापूरची केवळच एकच घटना नाही तर सोलापुरात तीन दिवसांत दहा मर्डर झाले आहेत. कुठाय तुमचं प्रशासन, कुठाय तुमची कायदा आणि सुव्यवस्था?

फडणवीस यांना गृहविभाग सांभाळता येत नसेल तर राजीनामा द्यावा किंवा दुसऱ्याकडे गृहखातं सोपवावं. त्या नराधमाचा फोटो पाहिल्यानंतर वाटतं की त्याला तिथंच काहीतरी करावं. त्याचे नातेवाईकही म्हणतात, आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही कायदा हातात घेतो. म्हणजे आता डोक्यावरून पाणी गेलं आहे, अशी खंतही प्रणिती शिंदे यांनी बोलून दाखवली.

त्या म्हणाल्या, महाविकास आघाडी सरकारने आणलेला शक्ती कायदा लागू करा. त्याची तुम्हाला कसली भीती आहे. पोक्सो अंतर्गत महिलांची ओळख सांगू शकत नाही. मात्र, सोलापुरात ते खुलेआम जाहीर केलं गेलं आहे. प्रशासनाच्या समोर या घटना घडतायत, त्यामुळे त्यांचीही मिलीभगत आहे.

नसरापूरमधील नराधमला फाशी झाली पाहिजे, शक्ती कायदा लागू करा. या नराधमावर पोक्सोच्या 2 ते 3 केसेस आहेत, हा सुटला कसा. एक महिला प्रतिनिधी म्हणून त्याचं वाईट वाटतं, अशी खंतही प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केली.

त्या म्हणाल्या, सत्तर फुट रोडसारख्या ठिकाणी मर्डर होतो, इतकी कायदा आणि सुव्यवस्था कोलमडून पडली आहे. फक्त इलेक्शन आणि हवरटपणा सुरू आहे. फक्त इलेक्शनदरम्यान गुन्हे दाखल होतात. सध्या शहरात मटका आणि इतर अवैध धंदे जोरात सुरू आहेत.

सत्ता त्यांची, प्रशासन त्यांच तरीसुद्धा त्यांना आमच्या सोबत येऊन विरोध दाखवावा लागतोय. कुठे नेऊन ठेवलाय हा महाराष्ट्र, फक्त खिसे कसे भरायचं एवढंच सत्ताधाऱ्यांचे सुरु आहे. प्रशासनावर मोठ्या प्रमाणावर दबाव असल्याने अधिकारी हे कॉम्प्रोमाईज झाले आहेत, असा आरोपही प्रणिती शिंदे यांनी केला.

## आ. मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, शंकरनगर येथे सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, भव्य रक्तदान आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील, यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि भगवान धन्वंतरींच्या पूजनाने या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी हॉस्पिटलच्या वतीने डॉ. प्रशांत निंबाळकर यांनी प्रास्ताविक केले. शिबिरात एकूण ६३५ लाभार्थ्यांनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला, ज्यामध्ये २३५ जणांनी रक्तदान केले, १५६ जणांचे जनरल चेकअप, ६१ ईसीजी,



६० नेत्र तपासणी, ५८ अस्थिरोग तपासणी, २२ एक्स-रे आणि १५ सोनोग्राफी तपासण्या करण्यात आल्या. या सोहळ्यात डॉ. एम. के. इनामदार यांनी उपस्थितांना वैद्यकीय मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अकलूज नगरपरिषदेचे प्रथम नगराध्यक्षा सौ. रेशमाताई अडगळे, मोटार वाहन निरीक्षक संदीप पाटील, शंकर सहकारी साखर कारखान्याचे एमडी स्वरूप देशमुख, डॉ. अमोल शिंदे, जनरल फिजिशियन डॉ. समीर दोशी, डॉ. बाहुबली दोशी (डायरेक्टर, दोशी पॅथॉलॉजी), निमा अध्यक्ष डॉ. अमोल माने आणि होमिओपॅथी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अभिजित राजे भोसले यांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच संस्थेचे ट्रस्टी संजय राकले,सहसचिव शिवदास शिंदे हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप प्रशासकीय अधिकारी विक्रमसिंह बागल यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सत्यजित खताळ यांनी केले.

## सिद्धिविनायक ट्रस्टला ५०० कोटींची मदत?

### पूरग्रस्त शेतकऱ्यांचे अनुदान रखडले; प्राधान्यक्रमांवर सवाल

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात ठिकठिकाणी भाजपची सत्ता आल्यापासून पैसाची उधळपट्टी करत असल्याचा आरोप अनेक अर्थतज्ञ व सोशल मीडियावर सर्वसामान्य जनता करत आहे. त्यात आणखी भर म्हणजे सिध्दीविनायक ट्रस्टला मुंबई महापालिकेकडून तब्बल ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याचा आरोप मनसेचे नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी केला आहे. दुसरीकडे, सप्टेंबर महिन्यातील पुरामुळे बाधित झालेल्या लाखो शेतकऱ्यांचे अनुदान अद्याप रखडल्याने राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे.

**पूरग्रस्तांचे हाल कायम; मदत अद्याप अपुरी**

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये राज्यातील अनेक जिल्ह्यांना पुराचा मोठा फटका बसला. पिकांचे प्रचंड नुकसान, शेतीची उद्ध्वस्त अवस्था आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची अपेक्षा होती. मात्र, अनेक भागांत अद्याप नुकसानभरपाई पूर्णपणे मिळालेली नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत.

'घोषणा मोठ्या होतात, पण प्रत्यक्षात खात्यात पैसे जमा होत नाहीत,' अशी नाराजी शेतकरी व्यक्त करत आहेत.

**५०० कोटींच्या निधीवरून वाद**

याच पार्श्वभूमीवर सिद्धिविनायक ट्रस्टला मोठ्या प्रमाणावर निधी देण्यात आल्याच्या आरोपांमुळे प्रश्न अधिक तीव्र झाले आहेत. आधीच कोट्यवधींच्या देणग्या मिळणाऱ्या धार्मिक संस्थेला सरकारी तिजोरीतून एवढा मोठा निधी देण्याची गरज काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करून आर्थिकदृष्ट्या सक्षम संस्थांना मदत देणे योग्य आहे का, असा मुद्दा विरोधक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून मांडला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, सरकारने खर्च करताना प्राधान्यक्रम स्पष्ट ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत, शेती क्षेत्राचे पुनरुज्जीवन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार या बाबींना अग्रक्रम देणे अपेक्षित असताना, धार्मिक संस्थांना निधी देण्याचा निर्णय वादग्रस्त ठरत आहे.

या मुद्द्यावर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. विरोधकांनी सरकारवर हृजनतेच्या पैशांचा चुकीचा वापरह्व करून उधळपट्टी केल्याचा आरोप केला आहे, तर सत्ताधारी पक्षाकडून या निर्णयाचे समर्थन करत विविध कारणे दिली जात आहेत.

**जनतेत वाढता असंतोष**

सामान्य नागरिकांमध्ये या प्रकरणामुळे असंतोष वाढताना दिसत आहे. 'पूरात सर्वस्व गमावलेल्या शेतकऱ्यांना मदत देणे ही सरकारची पहिली जबाबदारी आहे. त्याऐवजी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करणे योग्य आहे का?' असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

**पारदर्शकतेची गरज**

या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पारदर्शकता. प्रत्यक्षात हा निधी मुंबई च्या विकासासाठी वापरणं आवश्यक होते.

**पूरग्रस्तांच्या मदतीबाबत सरकारची ठोस भूमिका काय?**

या सर्व प्रश्नांची स्पष्ट आणि अधिकृत उत्तरे देणे सरकारसाठी अत्यावश्यक झाले आहे.

## बालिकेवरील अत्याचाराविरोधात सोलापूरकर रस्त्यावर

### नसरापूर घटनेचा निषेध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील नसरापूर येथे चार वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्र सुन्न झाला आहे. या घटनेच्या निषेधार्थ सोलापूरकरांनी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त केला.

'पुरावे गोळा करत बसण्यापेक्षा अशा नराधमांना जागेवरच ठेचून काढा; अन्यथा आमच्या हवाली करा, आम्हीच त्याला ठेचून काढू,' अशा संतप्त भावना व्यक्त करत सोमवारी कॅंडल मार्च काढण्यात आला.

चौपाड विठ्ठल मंदिर येथून निघालेला हा मूक निषेध मोर्चा सोलापूर ताडपत्री, सरस्वती बुक डेपो, इंदिरा कन्या प्रशाला मार्गे पुन्हा विठ्ठल मंदिराजवळ विसर्जित करण्यात आला. हातात मेणबत्त्या आणि मोबाईलचे टॉर्च घेऊन उपस्थित नागरिकांनी तीव्र निषेध नोंदवला.

मोर्चात सहभागी अनिता गवळी म्हणाल्या, 'अंगाचा थरकाप अजूनही उडत आहे. प्रशासनाने वेळीच पावले उचलली नाहीत, तर जनतेनेच पुढे येऊन कठोर भूमिका घ्यावी लागेल. अशा घटना आपल्या घरापर्यंत येण्याची वाट पाहू नका.'

विद्या शिंदे यांनी ६५ वर्षांच्या आरोपीच्या विकृत मानसिकतेवर संताप व्यक्त करत त्याला तत्काळ




शिक्षा देण्याची मागणी केली.

या मोर्चात ५०० हून अधिक नागरिक सहभागी झाले होते. सर्वांच्या चेहऱ्यावर संताप आणि डोळ्यांत पीडितेसाठी न्याय मिळवण्याची तीव्र भावना स्पष्टपणे जाणवत होती.

**बदलापूरप्रमाणे न्याय हवा**

ज्या नीच प्रवृत्तीने हे कृत्य केले, त्याला दोन महिन्यांच्या आत फाशी झालीच पाहिजे. न्यायव्यवस्थेने याकडे गांभीयार्ने लक्ष द्यावे. नगरसेवक अमोल शिंदे व अक्षय शिंदे यांनी ९० दिवसांत दोषारोपपत्र दाखल करून बदलापूर प्रकरणाप्रमाणेच कठोर धडा शिकवण्याची गरज असल्याचे सांगितले.

## सकल हिंदू समाजाच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन व श्रद्धांजली



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने सोलापुरातील जिल्हाधिकारी कार्यालय, पूनम गेट समोर जाहीर निषेध आंदोलन व श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या आंदोलनात विविध पक्षांचे, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी या घटनेबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले, 'नसरापूरच्या चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही आज रस्त्यावर उतरलो आहोत. या अमानुष घटनेमुळे समाजात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. अशा गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्याचे धाडस कोणी करणार नाही.'

ते पुढे म्हणाले, 'आजच्या काळात साडेतीन वर्षांची चिमुकलीदेखील सुरक्षित नाही, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. वासनेने पिसाळलेल्या नराधमांविरुद्ध समाजात तीव्र रोष आहे. अशा आरोपींना छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायपरंपरेप्रमाणे तातडीने चौरंग शिक्षा व्हावी, अशी जनतेची भावना आहे. अशा कठोर शिक्षेमुळेच गुन्हेगारांमध्ये कायद्याची जरब निर्माण होईल.'

महिलांवरील अत्याचार, विनयभंग, अँसिड हल्ले आणि हत्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करत त्यांनी राज्यात तातडीने शक्ती कायदा लागू करण्याची मागणी केली. 'शक्ती कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अत्याचाराच्या प्रकरणांतील आरोपींना अल्पावधीत कठोर शिक्षा होऊ शकते. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेसाठी हा कायदा तातडीने लागू करणे आवश्यक आहे,' असे त्यांनी सांगितले.

नरोटे यांनी न्यायप्रक्रियेतील विलंबावरही भाष्य केले. 'सततच्या तारखा आणि विलंबामुळे सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होत चालला आहे. गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण होणे अत्यावश्यक आहे,' असे ते म्हणाले. आंदोलनादरम्यान नसरापूर येथील चिमुकलीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दोषींना फाशीची शिक्षा द्यावी, तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी चेतनभाऊ नरोटे यांनी यावेळी केली.


यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, सुशीला आबुटे, महिला अध्यक्षा नगरसेवक नरसिंह आसादे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, मिडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, दिनेश म्हेत्रे, परशुराम सतारेवाले, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, गिरीधर थोरात, सागर उबाळे, सुनील सारंगी, सचिन पवार, मोहसीन फुलारी, भीमराव शिंदे, चंद्रकांत टिक्के, संजय कुराडे, दशरथ सामल, सचिन सुरवसे, जितराज गरड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## सोलापूरात इंजिनिअरिंग शिक्षणाला मोठी चालना

### तीन नवे पदवी अभ्यासक्रम सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सोलापूर व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून अभियांत्रिकी शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे. शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून पदवी स्तरावरील तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशिन लर्निंग,



कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या तीन अभ्यासक्रमांचा समावेश असून प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सोलापूरसह आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या या निर्णयांमुळे राज्यातील तांत्रिक शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल अपेक्षित असून विद्यार्थ्यांसाठी नवे मार्ग खुलणार आहेत. याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या हस्तांतरणामुळे महाविद्यालयाचे सक्षमीकरण होऊन अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होतील, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अधिक संधी मिळेल.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रंड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL | HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


### वात्रटिका

**मंथन आणि चिंतन**

का आपटलो, का सटकलो
आता विवेचन केले जाईल...
खापर फोडण्यासाठी शोध
आणि थोडे चिंतन सुद्धा होईल...
आश्वासनाची खैरात झाली
जुने सरकले मागे,नवे जन्मले...
घरात बसवले कोणाला तर
कोणी रेकॉर्ड ब्रेक केले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# न्यायाचा प्रश्न की सत्तेचा वापर? गृहमंत्र्यांच्या भूमिकेवर गंभीर सवाल

राज्यातील कायदा-सुव्यवस्था आणि न्यायव्यवस्थेबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेली अस्वस्थता आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. अलीकडच्या काही घटनांमुळे 'न्याय सर्वांसाठी समान आहे का?' हा मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः गृहमंत्रालयाच्या कार्यपद्धतीवर सातत्याने टीका होत असून, निष्पक्षतेबाबत शंका व्यक्त केल्या जात आहेत.

गंभीर आरोप असलेल्या काही प्रकरणांमध्ये संबंधितांना दिलासा मिळाल्याचे चित्र दिसते. उदाहरणार्थ, संजय राठोड, संपदा मुंडे, जयकुमार गोरे प्रकरणात क्लिन चीट देणारे हे गृहमंत्री आहेत. कोपर्डी प्रकरण अजून नाही, बदलापूर आरोपींना वाचवणे, भोंदू धीरेंद्र शास्त्रीला संरक्षण, ऑलम्पिक खेळाडूंना न्याय नाही 'आसाराम बापूला राम मंदिरात व्हीआयपी दर्शन' पद पैसा प्रतिष्ठा खुर्ची जात धर्म पाहून न्याय त्यामुळेच आज नसरापूर प्रकरणी आरोपीची हिम्मत वाढली' त्याला पॅरोल कोणी दिला ? वाल्मीक कराडला जेलमध्ये सुविधा शेकडो उदाहरणे आहेत' आरोपींची भीती संपली. ह्यांनी पदाचा वापर पक्ष फोडायला, बदल्या करायला आणि कॉल रेकॉर्ड करायला केलाय. हिंदुत्ववादी म्हणून ह्यांचं नाकर्तेपण दडवणारे हि महापापी आहेत. अशी सोशल मीडियावर जोरदार टीका होताना दिसून येते आहे. आणि यांच्या संदभार्तील कारवाईवरून सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. याचबरोबर कोपर्डी प्रकरणातील न्यायप्रक्रियेचा विलंब, बदलापूरसारख्या घटनांतील आरोपींना मिळालेल्या कथित संरक्षणाच्या आरोपांमुळे जनतेचा रोष अधिक तीव्र झाला आहे.

धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनाही मिळणाऱ्या विशेष वागणुकीबाबत प्रश्न उपस्थित होतात. यांना मिळालेल्या संरक्षणापासून ते यांना दिलेल्या सवलतींपर्यंत अनेक मुद्द्यांवरून 'कायद्यापुढे सर्व समान' हा तत्त्वज्ञानाचा पाया डळमळीत होत असल्याची टीका होते.

या पार्श्वभूमीवर सर्वात धोकादायक बाब म्हणजे गुन्हेगारांच्या मनातील भीती कमी होणे. नसरापूर प्रकरणासारख्या घटनांमध्ये आरोपींची वाढती धाडस ही केवळ वैयक्तिक विकृती नसून, प्रणालीतील त्रुटींचे द्योतक आहे. आरोपींना मिळणाऱ्या पॅरोल, तुरुंगातील सुविधा आणि विशेष वागणूक यामुळे चुकीचा संदेश समाजात जातो.

गृहमंत्रालयाचा वापर कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी होण्याऐवजी राजकीय हेतूंसाठी होत असल्याचे आरोपही गंभीर आहेत. पक्षफोड, बदली राजकारण, कॉल रेकॉर्डिंग यांसारख्या बाबी जर खऱ्या असतील, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. सत्ता ही जबाबदारी असते; ती सूड किंवा नियंत्रणाचे साधन बनली तर व्यवस्थेवरील विश्वास ढासळतो.

याहूनही चिंताजनक बाब म्हणजे अशा परिस्थितीतही काही घटक केवळ विचारसरणीच्या नावाखाली या अपयशाचे समर्थन करतात. ह्हिंदुत्वह्व किंवा इतर कोणत्याही विचारधारेच्या आडून प्रशासनातील त्रुटी झाकण्याचा प्रयत्न हा समाजासाठी अधिक घातक ठरू शकतो. कारण त्यामुळे वास्तव प्रश्नांकडून लक्ष विचलित होते.

आज गरज आहे ती भावनिक प्रतिक्रिया किंवा राजकीय घोषणांची नाही, तर ठोस आणि पारदर्शक कृतीची. न्यायप्रक्रियेची गती वाढवणे, पोलिस यंत्रणेला राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त करणे, सर्वांसाठी समान कायदा लागू करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जबाबदारी निश्चित करणे.

जर या मूलभूत बाबींवर काम झाले नाही, तर 'न्याय' ही संकल्पना केवळ कागदावरच उरेल. राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी सुरक्षित आणि न्याय्य वातावरण निर्माण करणे ही केवळ सरकारची नाही, तर संपूर्ण व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे.

न्यायाची अपेक्षा ठेवणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि त्या अपेक्षेला न्याय देणे ही सत्ताधाऱ्यांची अपरिहार्य जबाबदारी.

# निवडणुकीचा खेळ की लोकशाहीची कसोटी?

लोकशाही व्यवस्थेचा गाभा म्हणजे मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया. मात्र, अलीकडच्या काळात निवडणुका जिंकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. 'जिंकणे महत्त्वाचे की योग्य पद्धतीने जिंकणे?' हा मूलभूत प्रश्न आज अधिक तीव्रतेने समोर येत आहे.

निवडणूक जिंकण्यासाठी राजकीय पक्षांकडून आर्थिक, प्रशासकीय आणि प्रचार यंत्रणांचा आक्रमक वापर होत असल्याची टीका अनेक स्तरांतून केली जाते. विरोधकांची आर्थिक कोंडी करण्यासाठी विविध तपास यंत्रणांचा वापर केला जातो, अशी धारणा जनतेत तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वायत्त संस्थांच्या निष्पक्षतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माध्यमांची भूमिकाही या समीकरणात अत्यंत महत्त्वाची ठरते. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली माध्यमं जर सत्तेच्या दबावाखाली किंवा आर्थिक प्रभावाखाली काम करू लागली, तर जनतेपर्यंत पोहोचणारी माहिती एकतर्फी होण्याचा धोका निर्माण होतो. अप्रिय प्रश्न विचारले जात नाहीत, टीकात्मक बातम्यांना वाव मिळत नाही, आणि केवळ सत्ताधाऱ्यांच्या बाजूने अनुकूल वातावरण तयार केले जाते, अशी टीका वाढत आहे.

राजकीय स्पर्धकांना कमकुवत करण्यासाठी पक्षफोड, आमिषे, दबाव तंत्र यांचा वापर होत असल्याचे आरोपही वारंवार समोर येतात. निवडून आलेल्या प्रतिनिधींनाही नंतर फोडण्याच्या किंवा आपल्या बाजूला वळवण्याच्या प्रयत्नांमुळे मतदारांच्या कौलाचा अपमान होत असल्याची भावना निर्माण होते.

निवडणूक प्रक्रियेतही पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित होतो. मतदार यादीतील त्रुटी, अर्ज बाद होण्याच्या घटना, मतदान प्रक्रियेतील अनियमितता यांमुळे निवडणूक व्यवस्थेवरचा विश्वास कमी होऊ शकतो. निवडणूक आयोगासारख्या संस्थांनी पूर्ण निष्पक्षतेने आणि कडक देखरेखीने काम करणे ही काळाची गरज आहे.

यासोबतच समाजात द्वेषपूर्ण प्रचार, दिशाभूल करणारी माहिती आणि भावनिक ध्रुवीकरण यांचा वाढता वापर ही चिंतेची बाब आहे. बेरोजगारी, शिक्षणातील तफावत आणि आर्थिक असमानता यांचा वापर करून काही घटकांना राजकीय साधन म्हणून उभे केले जाते, अशी टीका होत आहे.

मतदारांना आकर्षित करण्यासाठी निवडणुकीपूर्वी रोख रक्कम, वस्तूंचे वाटप किंवा आश्वासनांचा पाऊस पाडला जातो. यामुळे लोकशाहीतील मतदानाचा पवित्र अधिकार 'व्यवहार' बनण्याचा धोका निर्माण होतो. निवडणुकीनंतर खर्च केलेल्या पैशांची वसुली करण्यासाठी सत्तेचा गैरवापर केल्याचे आरोपही वेळोवेळी पुढे येतात.

या सगळ्या पार्श्वभूमीवर सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो. लोकशाही टिकून आहे का, की ती केवळ एक औपचारिक प्रक्रिया बनत चालली आहे?

जर निवडणुका केवळ जिंकण्याचा खेळ बनल्या, तर जनतेचा विश्वास डळमळीत होणे अपरिहार्य आहे. आज गरज आहे ती केवळ टीकेची नाही, तर सुधारण्याची. स्वायत्त संस्थांची खरी स्वायत्तता, माध्यमांची निष्पक्षता, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जागरूक मतदार.

लोकशाही ही केवळ सत्ताधाऱ्यांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे. स्वातंत्र्यलढ्याने आपल्याला दिलेल्या मूल्यांची जपणूक करणे, प्रश्न विचारणे आणि योग्यतेसाठी उभे राहणे हीच खरी लोकशाहीची ताकद आहे.

निवडणुका 'भातुकलीचा खेळ' ठरू नयेत, तर त्या जनतेच्या विश्वासाचा आणि अधिकाराचा खरा उत्सव राहावा हीच आजची अपेक्षा.

# अनगर जुनियर कॉलेज बारावी बोर्ड परीक्षेत मोहोळ तालुक्यात अव्वल



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील कै.शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून अनगर च्या पाटील विद्यालयाचा निकाल मोहोळ तालुक्यात अव्वल लागला असून विज्ञान शाखेचा शंभर टक्के तर कला शाखेचा ८९.९२ टक्के निकाल लागला आहे.

अनगर येथील इयत्ता 12वी फेब्रु/मार्च 2026 परीक्षेमध्ये विज्ञान विभागातून प्रविष्ट 174 विद्यार्थ्यांपैकी 174 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले होते विज्ञान विषयाचा निकाल 100% निकाल लागला आहे. तसेच कला विभागातून 139 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी 125 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत कला विभागाचा 89.92% निकाल लागलेला आहे.

**विज्ञान शाखेतील पहिल्या तीन क्रमांकाचे विद्यार्थी**

1. 1. पलककुमारी व्यास पाण्डेय 86.33%
2. 2. रेणुका धनाजी कांबळे 82.17%
3. 3 आर्या उद्धव बंडगर 81.83%

**कला शाखेतील पहिल्या तीन क्रमांकाचे विद्यार्थी**

1. श्रद्धा रमेश खुर्दे 85.33%
2. 2.धनश्री संभाजी वाघमोडे 82.17%
3. 3.शहाजान जमीर मुलाणी 80.00%

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्रमुख राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील, लोकनेते शुगरचे चेअरमन विक्रांत (बाळराजे)पाटील,सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, संस्थेचे अध्यक्षा प्रियंका पाटील सचिव प्राजक्ता पाटील व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, प्राचार्य महादेव चोपडे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले , प्राचार्य महादेव चोपडे उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके,कला विभाग प्रमुख रमेश चव्हाण विज्ञान विभाग प्रमुख गोरख गायकवाड यांच्या शुभहस्ते सन्मान केला.

# सभासदांनी निवडणुकीच्या मतदार यादी साठी नावे समाविष्ट करावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सुत गिरणी लि. सोलापूर येथील सभासदांना निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. सुतगिरणीच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले असून, सर्व सभासदांनी आपली नावे मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी सभासदांनी आधारकार्ड व मतदान ओळखपत्राची प्रत सादर करावी. तसेच, संबंधित सभासद मयत असल्यास त्यांच्या कुटुंबीयांनी मृत्यूदाखला सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच सभासदांनी कागदपत्रे मा. प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापूर यांच्या कार्यालयात — सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची पतसंस्था इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे पुढील सात दिवसांत जमा करावीत, असेही सूचित करण्यात आले आहे.

सदर कागदपत्रे वेळेत सादर केल्यास मतदारयादीचे पुढील कामकाज सुरळीत पार पाडणे शक्य होणार आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी या आवाहनाची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे प्रशासक श्रीमती उज्वला पळसकर यांनी कळविले आहे.

# जलतारा शेतखड्डा उपक्रमासाठी अर्ज सादर करावेत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** चालू वर्षात एल-निनो (El Nino) च्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील शेतीवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पावसाचे उशिरा आगमन, पावसातील खंड, तसेच एकूण पर्जन्यमानात घट यामुळे खरीप हंगामातील पेरणी उशिरा होण्याची किंवा पुन्हा पेरणी (पुनर्लागवड) करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात 'जलतारा शेतखड्डा प्रात्यक्षिक' हा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे व भूजल पातळी वाढवणे हा आहे.

तसेच चिबड युक्त जमिनीमध्ये जलताराचे काम केल्यास पाण्याचा निचरा होऊन जमिन चिबडयुक्त होण्याचे प्रमाण कमी होऊन पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्याकरीता जलतारा हा अत्यंत महत्वपुर्ण व परिणामकारक उपाय आहे.

पावसाळ्यात शेतातून वाहून जाणारे पाणी योग्य ठिकाणी अडवण्यासाठी शेतात साधारण 5x5 फूट रुंद व 6 फूट खोल शोषखड्डे तयार करून त्यामध्ये दगड, खडी व वाळू भरून नैसर्गिक फिल्टर तयार केला जातो. त्यामुळे पाणी जमिनीत मुरून भूजल पुनर्भरणास मोठी मदत होते. तसेच चिबडयुक्त जमिनीत पाण्याचा निचरा सुधारतो. परिणामी विहिरी, बोअरवेल व पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते.

या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम पुढीलप्रमाणे आढळून आले आहेतः

- भूजल पातळीत सुमारे 14 फूटपर्यंत वाढ
- पिकांच्या उत्पादनात सुमारे 42 टक्क्यांनी वाढ
- शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुमारे 120 टक्क्यांनी वाढ
- पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा

तसेच दिनांक 1 मे ते 4 मे 2026 या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज पेटी ठेवण्याच्या सुचना सर्व तालुका कृषि अधिकारी यांनी देण्यात आलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच ग्रामपंचायत स्तरावर अर्ज पेटी उपलब्ध नसल्यास संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# मयुरी ढोबळे १२ वीत ८२% गुण मिळवुन नातेपुते केंद्रात प्रथम



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात नातेपुते येथील नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे डॉ. बा. ज. दाते प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी मयुरी मनोहर ढोबळे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. मयुरीने कला (आर्ट) शाखेत ८२% गुण मिळवून नातेपुते केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तिच्या या यशामुळे तीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. मयुरीची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तिचे वडील मनोहर ढोबळे आणि आई पल्लवी ढोबळे हे दोघेही मोलमजुरी करून संसाराचा गाडा हाकतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, घरात अठराविश्वे दारिद्र्य असतानाही मयुरीने अभ्यासात कधीही खंड पडू दिला नाही. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून तिने मिळवलेले हे यश समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.मयुरीने सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. अनेकदा कला शाखेकडे दुर्लक्ष केले जाते, मात्र मयुरीने याच शाखेतून कठोर परिश्रम घेऊन आपले वर्चस्व सिद्ध केले. मयुरी ढोबळे हिने मिळविलेले हे यश ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींनाही शिक्षणाची आणि जिद्दीची नवी उमेद देणारे ठरले आहे.

नियमित अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच मी हे यश मिळवू शकले. माझ्या आई-वडिलांनी मोलमजुरी करून मला शिकवले, त्यांच्या कष्टाचे फळ मला आज मिळाले आहे. भविष्यात मला प्रशासकीय सेवेत (यूपीएससी / एमपीएससी) स्पर्धा परीक्षेमध्ये करिअर करून देशसेवा करायची इच्छा आहे.

**मयुरी मनोहर ढोबळे**

एका ग्रामीण भागातील कष्टकरी कुटुंबातील मुलीने मिळवलेल्या या सुवर्णभरारीबद्दल नातेपुते केंद्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# गुणांसोबत आवडीलाही द्या प्राधान्य; करिअर निवडीची योग्य वेळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांतील विद्यार्थी आपल्या आवडीनुसार व गुणांनुसार योग्य अभ्यासक्रम निवडू शकतात.

विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय (MBBS, BAMS, BHMS), फार्मसी, कृषी, बायोटेक्नॉलॉजी, आयटी आणि डेटा सायन्स यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या संधी आहेत. या क्षेत्रांमध्ये प्रवेशासाठी JEE, NEET, CET यांसारख्या स्पर्धा परीक्षांना विशेष महत्त्व आहे.

वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी B.Com, BBA, CA, CS, CMA हे लोकप्रिय पर्याय आहेत. बँकिंग, फायनान्स, अकाउंटिंग आणि मॅनेजमेंट क्षेत्रात करिअर घडविण्याच्या संधी उपलब्ध आहेत.

कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी BA, LLB, BJMC (पत्रकारिता), सोशल वर्क, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन डिझाईन यांसारखे विविध अभ्यासक्रम उपलब्ध असून वकील, पत्रकार, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी अशा क्षेत्रांत करिअर करता येते.

याशिवाय आयटीआय, पॉलिटेक्निक, विविध डिप्लोमा कोर्सेसद्वारे तांत्रिक क्षेत्रात करिअर घडवता येते. तसेच NDA, UPSC, MPSC यांसारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे संरक्षण सेवा व सरकारी नोकरीच्या संधीही उपलब्ध आहेत.

तज्ज्ञांच्या मते, केवळ गुणांवर आधारित निर्णय न घेता विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्यातील संधी लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची निवड करावी. योग्य मार्गदर्शन आणि माहितीच्या आधारे घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांचे करिअर अधिक यशस्वी करू शकतो.

अभ्यासक्रमांच्या संधी (संक्षेप):

विज्ञान (Science): MBBS, BAMS, BHMS, BDS, Engineering, B.Sc, Pharmacy, Agriculture

करियर, डॉक्टर, इंजिनीअर, संशोधक, कृषी अधिकारी

वाणिज्य (Commerce): B.Com, BBA, CA, CS, CMA

करिअरः अकाउंटंट, चार्टर्ड अकाउंटंट, बँकिंग, मॅनेजर

कला (Arts): BA, LLB, BJMC, BSW, हॉटेल मॅनेजमेंट, डिझाईन

करिअरः वकील, पत्रकार, शिक्षक, प्रशासकीय सेवा

व्यावसायिक (Vocational): ITI, पॉलिटेक्निक, डिप्लोमा

करिअरः तांत्रिक कामे, उद्योग, स्वयंरोजगार

इतर पयार्यः NDA, UPSC, MPSC

करिअरः संरक्षण सेवा, सरकारी नोकरी, उद्योजकता

# बेदाणा उत्पादनात सोलापूर जिल्हा राज्यात अव्वल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा राज्यात बेदाणा उत्पादनात आघाडीवर असून राज्यातील बेदाणा उत्पादनात सुमारे ३६ टक्के वाटा सोलापूर जिल्ह्याचा असून जिल्ह्यातील बेदाणा उत्पादनात माढा तालुक्याचा वाटा सुमारे ३४ टक्के आहे.

यंदा वर्षभर बेदाण्याचे दर चांगले राहण्याचा अंदाज द्राक्ष तज्ञ व कृषी निष्ठ परिवाराचे प्रमुख नितीन कापसे यांनी सांगितले.

महाराष्ट्रामध्ये यंदा सुमारे एक लाख ७० हजार टन बेदाणा उत्पादन झालेले आहे. मागील वर्षी साधारणपणे एवढाच बेदाणा उत्पादित झालेला होता. २०२१-२२ व २०२२-२३ यावर्षीच्या तुलनेत सुमारे एक लाख टन बेदाण्याचे कमी उत्पादन झालेले आहे. सोलापूर जिल्हा हा बेदाणा उत्पादनात राज्यात अग्रेसर आहे. सोलापूर जिल्ह्याच्या परिसरामध्ये विजापूर, सोलापूर, तासगाव, सांगली, पंढरपूर या पाच ठिकाणी बेदाण्याची मार्केट आहेत. शिवाय सोलापूर जिल्ह्यात द्राक्ष व बेदाणा उत्पादनामध्ये वाढ होताना दिसून येत आहे. द्राक्षतज्ञ नितीन कापसे यांनी सांगितले की महाराष्ट्रामध्ये सुमारे चार लाख हेक्टरवर द्राक्ष लागवड होते. त्यापैकी साधारणपणे ७२ टक्के द्राक्षे ही थेट बाजारात विकली जातात. २४ टक्के द्राक्षे ही बेदाणा निर्मितीसाठी वापरली जातात तर १.५ टक्के द्राक्षांपासून वाईन तयार केली जाते व अर्धा टक्के द्राक्षे ही ज्यूससाठी वापरली जातात.

मागील दोन वर्षाच्या तुलनेमध्ये यंदा बेदाणा उत्पादन सुमारे एक लाख टनाने घटलेले आहे या परिसरातील कोल्ड स्टोरेजच्या क्षमतेच्या केवळ ६० टक्के कोल्ड स्टोरेज बेदाण्याने भरलेली आहेत. त्यामुळे बेदाण्यासाठी वर्षभर चांगला दर राहण्याची शक्यता आहे. सध्या बेदाण्याचा दर किलोला २८० रुपयांपासून चारशे रुपयेपर्यंत आहे तर काळा बेदण्याचा किलोला दर २०० ते २८० रुपये असल्याचे नितीन कापसे यांनी सांगितले.

# कचरा डेपो पुन्हा धगधगला! सोलापूर-तुळजापूर रोडवर आगीचे तांडव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर तुळजापूर रोडवर असलेल्या महापालिकेच्या कचरा डेपोला भर दुपारीच आग लागली. या आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम अग्निशमन दलाकडून केले जात आहे. दरम्यान गेल्या दोन-तीन वर्षांपूर्वीही अशीच येथील कचरा डेपोला आग लागली होती.

त्यावेळी कचरा डेपोला लागलेली आग सुमारे महिनाभर धुमसत होती. आताही येथीलच कचरा डेपोला आग लागली असून धुराचे लोट सर्वत्र पसरत आहेत. दुपारी उन्हाची तीव्रता अधिक असल्याने आग लवकर आटोक्यात येणे जिकरीचे बनले आहे. आग लवकर नियंत्रणात आली नाही तर यातून निर्माण होणारा धूर व काजळी शहरात पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# नागेश करजगी ऑर्किड ज्युनियर कॉलेज चे एच एस सी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एच एस सी बोर्ड फेब्रुवारी २०२६ परीक्षेमध्ये नागेश करजगी ऑर्किड ज्युनिअर कॉलेजने उल्लेखनीय यश संपादन केले श्रेया संजय मसाळ हिने ८५.५०% घेऊन प्रथम क्रमांक मिळविला, रौनक निर्भय राज याने ८५.१७% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला, तसेच गौरांग गणेश मामड्याल ८२.८३%, स्नेहा सुर्यकांत गांगडे ८२ %, आर्यन दीपक सुरवसे ८१.३३%,जिया सुमीत कांकरिया ८१%, शुभम राजू आडम ८०.६७%, अर्शप्रीती मधुकर ओव्हाळ ८०%, तेजस्वी शिवराज मोने ८०% यांनी उत्कृष्ट





गुण मिळवून यश संपादन केले आहे. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी कॉलेजचा निकाल १००% लागला.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा सौ वर्षा विभूते, व्यवस्थापक श्री अक्षय चिडगुंपी, कॉलेजच्या प्राचार्य सौ स्मिता कुलकर्णी शाळेच्या प्राचार्या सौ रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी अभिनंदन केले तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राज्यपालांच्या पुढाकाराने मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये 'टीबी मुक्त भारत' अभियान राबविणार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये ह्यटीबी मुक्त भारतह्व अभियान राबवले जाईल व राज्याचा आरोग्य विभाग, मुंबई महानगर पालिका तसेच रेड क्रॉस सोसायटी व विद्यापीठांना या कार्यात सहभागी केले जाईल, अशी माहिती राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दिली.

राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी रेड क्रॉस सोसायटीच्या महाराष्ट्र शाखेची बैठक संपन्न झाली तसेच राज्यातील तीन विद्यापीठांच्या कुलगुरुंची स्वतंत्रपणे बैठक झाली, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

पंतप्रधानांच्या सूचनेनुसार देशव्यापी 'टीबी मुक्त भारत'अभियान राबवले जात आहे. परंतु लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या झोपडपट्टूयांमध्ये क्षयरोगाचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईतील कुर्ला तसेच इतर भागांमधील झोपडपट्टूयांमध्ये टीबीमुक्त भारत अभियान राबवले जाईल असे राज्यपालांनी जाहीर केले.

क्षयरोगाची तपासणी लवकर झाल्यास क्षयरोगावर नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे आरोग्य विभाग व पालिकेतर्फे क्षयरोग तपासणी केली जाईल. तर टीबी संदर्भात माहिती, शिक्षण व जनजागृतीचे कार्य रेड क्रॉस महाराष्ट्र शाखेतर्फे केले जाईल. या अभियानात एनसीसी, स्काऊट ड्र गाईड, रोटरी क्लब, युवा रेड क्रॉस स्वयंसेवक यांना देखील सहभागी करुन घेतले जाईल, असे राज्यपालांनी सांगितले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी विज्ञान विभागाचा निकाल 100%

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान विभागाचा निकाल 100% लागला असून यामुळे महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. तज्ञ प्राध्यापकाकडून वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सातत्याने अभ्यासावर अधिक भर देत असल्यामुळे दरवर्षी विद्यालयाचा निकाल 100% लागत आहे. असे यावेळी संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात



ते बोलत होते. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख पारितोषिक, शाल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते.

विज्ञान शाखेतील यश बागलकोटी हा विद्यार्थी 74.67 % घेऊन प्रथम आला आहे. शंकर नीळ व कु राजनंदिनी ताकमोगे या दोघानी 73.33 % घेऊन द्वितीय तर सिद्धाराम कोरे हा विद्यार्थी 72 टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.

कला विद्या शाखेचा निकाल 68.57 % लागला असून कु सपना चेंडके 78.83 घेऊन प्रथम आली, कु विजयालक्ष्मी चेंडके 66.67% घेऊन दुसरी तर कु महेक कारंजे 64.67 % घेऊन तिसरी आली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचा 79.06% निकाल लागला असून कु आदिती कटारे ही 75% मिळवून प्रथम आली, कु समीक्षा मोरे 73.83% मिळवून दुसरी तर कु स्नेहा भिकमळी 71.50% गुण मिळवून तिसरी आली आहे. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग व बहुसंख्य पालक उपस्थित होते.

सूत्रसंचलन प्राध्यापक शिवकुमार मठदेवरू यांनी केले तर उपस्थितांचे आभार मधुबाला लोणारी यांनी मानले.

# अक्कलकोट-गाणगापूर रस्त्यावर एसटी आणि डंपरची भीषण धडक; २ प्रवाशांचा जागीच मृत्यू

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** गाणगापूरकडून अक्कलकोटकडे येणाऱ्या एसटी बस आणि डंपरची समोरासमोर धडक बसून झालेल्या भीषण अपघातात एसटीतील २ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.



तर १० प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर लागलेल्या आगीत डंपर पूर्णपणे जळून खाक झाला. तसेच एसटी बसचेही प्रचंड नुकसान झाले. हा अपघात अक्कलकोट झ गाणगापूर रस्त्यावर रूद्देवाडी बस स्टॉपजवळ सोमवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास झाला.

चंद्रभागा लाडप्पा डडपड (वय १८, रा. चिकहळ्ळी ता. अक्कलकोट), चांगदेव श्रीरंग लवटे (वय ७६, रा. डुकुरवाडी भूम, जिल्हा धाराशिव) अक्कलकोट रुद्देवाडी येथे झालेल्या अपघातानंतर डंपरने पेट घेतला. दुसऱ्या छायाचित्रात जखमींवर उपचार करताना डॉक्टर. अशी मृतांची नावे आहेत.याप्रकरणी बसचालक जोतीराम दिलीप चव्हाण (वय ३९) यांनी फिर्याद दिली.

आरोपी डंपर चालक अजयकुमार अर्जुन यादवरा (पद्माजि. पलामू, राज्य झारखंड) याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.गाणगापूरकडून अक्कलकोटकडे येणाऱ्या बसचा (क्रमांक एम. एच. १३ सीयू ८३३) ला टिपर (क्रमांकएम. एच. ०७ एजे ३९०६) ने समोरून जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की बसमधील काही प्रवासी बाहेर फेकले गेले. तर एका वृद्धाचा बसमध्येचगंभीर जखमी होऊन जागेवर मृत्यू झाला. त्यानंतर धडक दिलेला डंपर काही अंतरावर जाऊन उलटला व त्या डंपरला आग लागली. या आगीत डंपर पूर्णपणे जळून खाक झाला. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी बसमधील तातडीने जखमींना बाहेर काढले.

अपघातात बसमधील प्रवासी अमिन इब्राहिम वतीयाळ (वय ५०, रा. माशाळ) यांच्या चेहऱ्यांमध्ये काचा घुसल्याने त्यांना सोलापूरला पाठविण्यात आले. जखमी रुग्णांना येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यासंदर्भात अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहायक निरीक्षक माने करीत आहेत.

# ८४ शिक्षकांचे वेतन अदा करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील अंशतः अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे वेतन अदा करा.अशी मागणी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे केल्याची माहीती माहीती डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली.



१९ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील १६२८ शाळा व २४५२ तुकड्या २०% अनुदानासाठी पात्र ठरविण्यातआल्या होत्या. जिल्हातील २० शाळा व ८४ शिक्षक त्यानुसार अनुदानास पात्र ठरले.तात्कालीन शिक्षण संचालकांच्या १७ एप्रिल २०१७ च्या आदेशानुसार अनुदानपात्र शाळांतील शिक्षकांना शालार्थ आयडी देण्यात आले.या शाळांचे डिजिटलायजेशन करताना कागदपत्र अपलोड होण्यास अडचणी येत असल्याच्या कारणावरुन संबंधित शाळांची वेतन देयके रिजेक्ट करण्यात आली आहेत.त्यामुळे या शिक्षकांचे वेतन अदा होणार नाही.तात्कालिन अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांना स्वतंत्र शालार्थ आयडी आदेश नसल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे.डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्यावतीने या शिक्षकांचे वेतन अदा करण्यात यावे.यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याशी चर्चा करण्यात येईल.असे आप्पाराव इटेकर, विनोद आगलावे,वल्लभ चौगुले व अ.गफुर अरब प्रयत्नशील आहेत.

> संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शिक्षण संचालकांनी शालार्थ आयडी दिले आहेत.स्वतंत्र आदेश नसल्यामुळे कागदपत्रे अपलोड होत नाहीत.या शाळांतील शिक्षकांचे वेतन अदा करण्यात यावे.
>
> **- सुनिल चव्हाण,**
> प्रदेश महासचिव डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. या सादरीकरणासाठी पर्यवेक्षक म्हणून प्रा. ए. डी. पाटील (प्राचार्य, कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय मदडगाव) व प्रा . जी. एम. काळुंगे (प्रकल्प समन्वयक, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय मदडगाव) हे लाभले होते. डॉ. ए. डी. पाटील यांचे स्वागत लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांच्या हस्ते व प्रा. जी एम काळुंगे यांचे स्वागत प्रा. आशिष सरकाळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. या प्रकल्प सादरीकरणात विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान व एन्टरप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट इन बायोटेक्नॉलॉजी अंतर्गत विविध विषयांवर त्यांचे प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध पिकांचे टिश्यू कल्चर, सूक्ष्मजीवशास्त्र तंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय विविधता व पिकांचे संकर ओळखणे आदींचा समावेश होता. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने लिंबू, ऊस, केळी, पेरू, बांबू, डाळिंब, जरबेरा, सिंगोनियम, साग, गहू, कांदा, मकाआदी पिकांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात ऊती संवर्धन व सूक्ष्मजीवशास्त्राचा वापर करुन पिकांमध्ये संशोधन कशाप्रकारे केले जाते, पिकांची जैविविधता कशाप्रकारे तपासली जाते, त्याचा वापर कशाप्रकारे पिकांच्या विविध जाती विकसित करण्यासाठी केला जातो याविषयी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांद्वारे अनुभवता आले. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. सायली बडेकर यांनी व सूत्रसंचालन सावरी बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यायाचे प्राचार्य सागर महाजन, प्रा. सायली बडेकर, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अपूर्वा पिस्के तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# नवीन वाहनामुळे ग्रामीण पोलीस दलाची कार्यक्षमता अधिक वाढेल- पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ग्रामीण पोलीस विभागाला विविध पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या निधीतून पोलीस विभागाने खरेदी केलेल्या वाहनामुळे पोलीस दलाची कार्यक्षमता अधिक वाढली जाणार आहे त्यामुळे पोलीस दलाने सर्वसामान्य नागरिकांना अधिक गतिमान पद्धतीने सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.



सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालयात शुक्रवार, १ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य सोहळा पार पडला. मुख्यालय येथील ओपन लॉन चे उद्घाटन, डॉरमेट्री हॉलचे भूमिपूजन तर पोलीस विभागाच्या विविध वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, महापौर विनायक कोंड्याल, आमदार देवेंद्र कोठे, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिदेशक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्हा नियोजन समितीतून वाहनासाठी 95 लाख, ओपन लॉन साठी 45 लाख तर डॉरमेट्री हॉल साठी एक कोटी 34 लाख उपलब्ध करून दिलेले आहेत अशी माहिती दिली. यामुळे पोलीस मुख्यालयाच्या अधोरेखित पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार आहे.

**ग्रामीण पोलीस दलाच्या पुढाकारातून जिल्ह्यात ऑरगॅनिक शेतीला चालना-पालकमंत्री**

ग्रामीण पोलीस दलाच्या विशेषता पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या प्रयत्नातून सोलापूर जिल्ह्यात वृक्ष लागवडी बरोबरच ऑरगॅनिक शेतीला प्राधान्य दिले जात आहे. पोलीस विभाग जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटलांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना ऑरगॅनिक शेतीचे महत्व सांगून ती शेती करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. सध्या शेतीचे उत्पादन वाढवणे तसेच शेती पिकाला कीड लागू नये म्हणून मोठ्या प्रमाणावर रसायने फवारली जात आहेत, त्यातून कॅन्सर सारख्या आजाराचे प्रमाणात वाढ झाल्याचे निर्देशनास आलेले आहे. त्यामुळे ग्रामीण पोलीस दलाने ऑरगॅनिक शेतीला दिलेली चालना हा एक चांगला उपक्रम असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

ग्रामीण पोलीस विभागाकडून पोलीस मुख्यालयाच्या शेजारी पेट्रोल पंप चालवला जातो त्या ठिकाणी आयोजित ऑरगॅनिक भाज्या व फळांच्या स्टॉलचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, पोलीस विभागाकडून विषमुक्त शेती करण्याचा संदेश दिला जात आहे. त्याचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेऊन सेंद्रिय शेतीकडे वळावे. त्याप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी येथे सुरू असलेल्या सेंद्रिय भाज्या व फळांच्या स्टॉलला भेट देऊन मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचे आवाहन ही यावेळी त्यांनी केले.

प्रारंभी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगून जिल्ह्यातील शेतकरी यासाठी चांगला प्रतिसाद देत आहेत तसेच अशा शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या भाज्या व फळाला बाजारपेठ मिळावी म्हणून ग्रामीण पोलीस दलाच्या पेट्रोल पंपाच्या ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले.

# महापालिकेच्या शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेने यंदा सरासरी १७ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट ठेवले असून 'मिशन स्कॉलरशिप'च्या माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा टक्का वाढविण्यावर विशेष भर देण्यात येईल. इयत्ता पहिलीसाठी उत्कृष्ट शिक्षकांची नेमणूक करून सप्टेंबर २०२६ अखेर सर्व विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञान आत्मसात करून देण्याचा निर्धार व्यक्त करत शिक्षणाचा दर्जा उंचावणे, पटसंख्या वाढवणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे या उद्दिष्टांसह विविध महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षकांच्या सहविचार सभेत घेण्यात आले.

आगामी शैक्षणिक वर्षाच्या पूर्वतयारीसाठी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या सर्व शिक्षकांची सहविचार सभा हरीभाई देवकरण प्रशाला येथील मुळे सभागृहात उत्साहात पार पडली. या सभेस महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे नियंत्रण अधिकारी तथा मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्न राज जवळगेकर, प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक मनीष बांगर, रजनी राऊळ, निलोफर सय्यद यांनी विविध शैक्षणिक विषयांचा



> **महापालिका शाळांमध्ये इंग्रजी भाषेच्या अध्यापनासाठी विशेष उपक्रम : डॉ. जवळगेकर**
>
> इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढणारे आकर्षण लक्षात घेऊन महापालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी भाषेच्या अध्यापनासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नवीन वर्गखोल्या व इमारतींसाठी महापालिका अंदाजपत्रकात ३ कोटी ३६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. किरकोळ दुरुस्ती, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शनासाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे, असे मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी स्पष्ट केले.

आढावा घेतला.

मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी शिक्षकांचे प्रश्न वेळेत मार्गी लावून त्यांना चिंतामुक्त वातावरण देण्यावरही भर देण्यात येणार आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी सन्मानित करून प्रोत्साहन दिले जाणार आहे, असे सांगितले. महापालिकेतील शिक्षकांची मंजूर पदसंख्या ७२२ वरून सध्या २२० पर्यंत घटल्याची बाबही यावेळी मांडण्यात आली.

महापालिकेने यंदा सरासरी १७ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट ठेवले असून 'मिशन स्कॉलरशिप'च्या माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा टक्का वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. इयत्ता पहिलीसाठी उत्कृष्ट शिक्षकांची नेमणूक करून सप्टेंबर २०२६ अखेर सर्व विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञान आत्मसात करून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. 'निपुण महाराष्ट्र' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शैक्षणिक पाया भक्कम करण्यावरही भर देण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढ, पटसंख्या वाढ आणि मूलभूत कौशल्यांवर भर देत महापालिका शाळांना नवसंजीवनी देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या सहविचार सभेस महापालिकेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिक्षकांनी समर्पण भावनेने काम करावे : मल्हारी माने**

शिक्षकांनी समर्पण भावनेने काम करून गुणवत्ता व पटसंख्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. शिक्षकांना कार्यालयीन कामकाजासाठी त्रास होऊ नये यासाठी सुलभ व्यवस्था निर्माण करण्यात येईल. पुढील काळामध्ये महापालिकेच्या शाळाकडे पाहण्याचा समाजाचा आणि पालकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी स्पष्ट केले.

# सत्यशोधक विवाह सत्यावर आधरित असल्याने त्याचे सर्व जाती धर्मामध्ये अनुकरण व्हावे !!! - सत्यशोधक रघुनाथ ढोक

## फुले एज्युकेशन तर्फे प्राध्यापक मुलाणी - कांबळे यांचा अंतरधर्मीय 56 वा सत्यशोधक विवाह सोहळा संपन्न !!!

**फलटण (कटूसत्य वृत्त) :-** फुले शाहू आंबेडकर एज्युकेशनल अँड सोशल फाउंडेशनचे बहुउद्देशीय सत्यशोधक केंद्रातर्फे थोर समाजसुधारक महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त उच्चशिक्षित सत्यशोधिका प्रा. अॅड.करिष्मा मुलाणी, इरछ.छछट,रएळ आणि सत्यशोधक प्रा. श्रेयस कांबळे M.A.NET., लॉ. कॉलेज, फलटण यांचा अक्षत रेसिडेन्सी, जाधववाडी येथे रविवारी दि.03 मे 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता 56 वा अंतर धर्मीय मोफत सत्यशोधक विवाह सोहळा शानदार पणे स्वताचे बंगल्यात मोजक्या मित्रमंडळी आणि नातेवाईक यांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला.



या दारक दारिकाची रजिस्टर नोंदणी करून महात्मा फुले यांच्या वेशभूषेत विधी कार्य पार पाडीत विधीकर्ते संस्थेचे अध्यक्ष व महात्मा फुले चरित्र साधने साहित्य व प्रकाशन समिती महाराष्ट्र शासनाचे सदस्य सत्यशोधक रघुनाथ ढोक यांचे शुभहस्ते सत्यशोधक विवाह प्रमाणपत्र आणि थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची फोटो फ्रेम संस्थेचे वतीने भेट देण्यात आली . राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे विश्वस्थ प्रा. सुदाम धाडगे सर यांनी भारतीय उद्देशिका चे वाचन आणि महात्मा फुले रचित मंगलाष्टके चे गायन केले. यावेळी अक्षता म्हणून सुंगधी फुलांच्या पाकळ्या वापरण्यात आले.

आयोजक व विधीकर्ते सत्यशोधक रघुनाथ ढोक म्हणाले की दारक श्रेयस आणि दारिका करिश्मा उच्चशिक्षित असून हे लॉं.कॉलेज चे प्राध्यापक असल्याने त्यांनी स्वतः महात्मा फुले यांची २०० वी जयंती निमित्त सत्यशोधक पद्धतीने विवाह करून आपण फक्त मनुष्य जात मानतो आणि आमचा संविधानिक मुल्यांवर दृढ विश्वास आहे , हे कृतीतून दाखवून दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांचा हा आदर्श सत्यशोधक विवाह सत्यावर आधरित असल्याने त्याचे सर्व जाती धर्मामध्ये अनुकरण व्हावे असे देखील ढोक यांनी यावेळी आव्हान केले.

विवाहाचे सुरुवातीला फुलांच्या पायघड्यावरून दारक आणि दारिका यांचे राष्ट्रीय ग्रंथ भारताचे संविधान आणि समग्र वाड्मय हातात घेऊन आगमन झाले त्यानंतर दोघांचे शुभ हस्ते थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यास हार अर्पण करीत मान्यवरासह ग्रंथांचे पूजन करण्यात आले तर सवार्ना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले ग्रंथ आणि गुलाबाचे झाड देण्यात आले तर विधीकर्त्यार्ना मोघराचे झाड भेट देऊन स्वागत केले.

याप्रसंगी दारक श्रेयस आणि दारिका करिश्मा यांनी शपथ पत्राचे वाचन करून निसर्ग देवता आणि सर्वांचे साक्षीने निर्भय सत्यशोधक तयार करण्याचे आश्वासन देत मौलिक विचार देखील मांडत करिश्मा हिने आभार मानताना आजच साऊ संग्रह कांबळे ही दोन महिन्याची झाली म्हणून वाढदिवस साजरा करीत सावित्रीमाई यांची तयास मानव म्हणावे का ही कविता सादर केली. तर कांबळे मामीनी ज्ञानज्योती कविता सादर करून या सत्यशोधक सोहळ्यास रंगत आणली.

यावेळी लोकमतचे पत्रकार विकास शिंदे, जेष्ठ समाजसेवक दादा कांबळे, विजय आमने आणि लॉ. कॉलेजचे विध्यार्थी विध्यार्थिनी व स्टाफ सह इतर मित्रमंडळी, नातेवाईक मान्यवर उपस्थितीत होते.त्या सर्वांनी देखील आपले विचार मांडताना कांबळे मुलाणी यांना खरे कृतीशील वारसा स्वतः पुढे नेला म्हणून देखील अभिनंदन केले.

# नातेपुते महावितरणच्या मनमानी कारभाराविरुद्ध जन आक्रोश

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** ज्या मातीने आजवर सोन्यासारखी पिके दिली, त्याच मातीत आज पाण्याअभावी उभी पिके करपून जाताना पाहून नातेपुते परिसरातील बळीराजाचे काळीज हेलावले आहे. घामाचे दाम मिळण्याऐवजी महावितरणच्या गलथान कारभारामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याने, अखेर नातेपुतेकरांच्या संयमाचा बांध फुटला आसुन समस्त ग्रामस्थ आणि शेतकरी बांधवांनी एकत्र येत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांच्या नेतृत्वाखाली आपल्या हक्काच्या विजेसाठी नातेपुते महावितरणच्या मनमानी कारभाराविरुद्ध 'जन आक्रोश' पुकारत उपाययोजना करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देत

महावितरणच्या कार्यकारी अभियंता यांना नातेपुते येथील शेतकरी, व्यापारी व ग्रामस्थ यांनी निवेदन दिले आहे.



या देण्यात आलेल्या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की,भर उन्हात रक्ताचं पाणी करून राबणाऱ्या शेतकऱ्याला रात्रीच्या वेळी अंधारात जीव धोक्यात घालून ओलितासाठी जावे लागते. "आम्हाला रात्रीची वीज नको, तर दिवसा सलग ८ ते १० तास वीज द्या, पश्चिम भागातील शेकडो एकरवरील पिके केवळ विजेच्या लपंडावामुळे जळून खाक होत आहेत. आमची पिके डोळ्यादेखील जळून जाताना पाहण्याचे दुःख सरकारला कळणार का ? जीवघेणा प्रवास आणि अंधारातील भीती नातेपुते शहराच्या गजबजलेल्या टिळक चौक व माऊली मंदिर परिसरात उघड्या वीज तारा घरांना स्पर्श करत आहेत. एखादा मोठा अपघात होण्याची वाट प्रशासन पाहत आहे का ? गंजलेले खांब आणि वारंवार उडणारे फ्यूज यामुळे सर्वसामान्य जनता हैराण आहे. त्यात मीटर रीडिंग न घेता येणारी अव्वाच्या सव्वा बिले म्हणजे सामान्य माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार हे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी करीत आहेत. नातेपुते बाजारपेठेचे अर्थकारण विजेवर अवलंबून आहे. जर व्यापाऱ्यांचे आणि शेतकऱ्यांचे हे आर्थिक नुकसान थांबले नाही, तर हा 'जन आक्रोश' महावितरणला महागात पडेल.आता केवळ विनंती नाही, तर हा इशारा आहे!" अशा भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी निवेदनाद्वारे व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे नातेपुते येथील महावितरणविरोधात मोठे जनमत तयार झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पावले उचलावी आमचा अंत पाहू नये असा इशारा नातेपुते येथील शेतकरी, व्यापारी व ग्रामस्थ यांनी प्रशासनाला दिला आहे. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड, शिवसेनेचे अमोल उराडे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष देवीदास चांगण, डॉ.नरेंद्र कवितके,किशोर पलंगे, सामाजिक कार्यकर्ते संतोष देवकाते, आरपीआयचे बंटी सोरटे, माजी ग्रा.प. सदस्य गणेश पागे,अॅड. दादा कोळे, संजय उराडे,बाबा बोडरे, शेखर अटक, अक्षय ठोंबरे, अजित पांढरे,धनराज डफळ,प्रथमेश पांढरे, अर्जुन पिसाळ, सोमा भोसले, अमरजित जानकर, जयराज पांढरे, सागर रूपनवर, सागर राऊत,निलेश पोतदार, किशोर दगडे,प्रसाद पांढरे, अभिजीत वाळके, प्रशांत ठोंबरे, गणेश कुचेकर,कमरुद्दीन पालकर, ओम दोशी,रोहित दोशी, नंदू धालपे तसेच व्यापारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.